
महान स्त्रिया
अनुराधा पोतदार
परी प्रकाशन

महान स्त्रिया

©  सुरक्षित

प्रकाशक :
परी प्रकाशन
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

प्रमुख वितरक
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

मुखपृष्ठ :
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

मुद्रक :
जयंत प्रिंटरी

आवृत्ती :
२९ ऑगस्ट, २०१३

किंमत :
रुपये १२०/-

## अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १. | गरिबांची माय – मदर तेरेसा | ३ |
| २. | अंतराळवीर कल्पना चावला | १९ |
| ३. | दुर्गाबाई खोटे | ३६ |
| ४. | स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर | ५३ |
| ५. | लढवय्या नसीमा हुरजुक | ७१ |
| ६. | निर्धारमूर्ती किरण बेदी | ८६ |
| ७. | स्वयंसिद्धा – कांचनताई परुळेकर | १०२ |
| ८. | विजयालक्ष्मी पंडित | ११९ |
| ९. | भारतकोकिळा – सरोजिनी नायडू | १३६ |
| १०. | कर्तृत्ववान हिलरी क्लिंटन | १५२ |

# गरिबांची माय – मदर तेरेसा



## मुलाचे पाय पाळण्यात दिसतात

युगोस्लाविया नावाचा देश, जो जगाच्या नकाशात फारसा ठळक नसलेला. अशा या देशातले स्कोपजे नावाचे एक छोटेसे खेडे होते. तिथे २० ते २५ हजार एवढीच लोकसंख्या होती. देशांर्गत लढायांनी, वारंवार होणाऱ्या भूकंपांनी नेहमी अशांती असे. त्यात दुसऱ्या महायुध्दामुळे देशातले वातावरण अगदी गढूळ होऊन गेले होते. या गावाचे वैशिष्टय म्हणजे तिथे पूर्व–पश्चिम संस्कृतीचे छान मिश्रण झाले होते. या गावात टर्कीश, ग्रीक, जिप्सी आणि स्लाव्ह वंशाचे लोक गुण्यागोविंदाने राहात होते. त्यामुळे मशिदी व चर्च जवळजवळ होते.

गाव तसे खाऊन पिऊन सुखी होते. हिरव्यागार टेकड्यांनी वेढलेल्या या गावात सकस चारा खाऊन मेंढ्या अगदी गरगरीत झाल्या होत्या. अशा या संपन्न गावात कॅथलिक कुटुंबात २७ ऑगस्ट १९१० ला ज्यांना सारं जग 'मदर तेरेसा' म्हणून ओळखतो त्यांचा जन्म झाला. त्यांचं नाव अतिशय अवघड – गोक्झा बोजाक्झिऊ होतं. गोक्झाचे वडील बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टर होते. गावात त्यांची चांगली नामांकित कंपनी होती. स्कोपजे गावात पहिलं थिएटर बोजाक्झिऊनीच बांधले. वडील हुशार होते, श्रीमंत होते, त्याचबरोबर दानशूर होते. त्यांना गरिबांबद्दल कळवळा होता. हे गरिबांवरचे प्रेम बघतच गोक्झा लहानाची मोठी झाली. तिला घरी ॲग्नेस म्हणत. ॲग्नेसच्या वडिलांना अल्बनियन भावखेरीज अनेक भाषा अवगत होत्या. आईचं नाव डूनाफाईल बर्नाई होतं. आई–वडील दोघेही धार्मिक असल्याने घरात धार्मिक वातावरण होतं. ॲग्नेसच्या मोठ्या भावाचं नाव लाझार व बहिणीचं नाव ॲगा होतं. ऐसपैस घर होतं. या भावंडांचं जमायचंही छान. तीनही भावंडांवर आपल्या सात्विक आईचा पगडा होता. देवावर तिची अपार श्रध्दा होती. आईनं या मुलांना फक्त देवावर नव्हे तर शेजाऱ्यावरही प्रेम करायला शिकवलं. आई कमालीची तत्त्वनिष्ठ असल्याने तिने मुलांवर उत्तम संस्कार केले. ही मुले आईला 'नानालोके' म्हणत. नानाचा अर्थ

आई तर लोके म्हणजे आत्मा. तिनं खरोखरच या तिन्ही मुलांचे आत्मे सुसंस्कृत घडवले. आईला काहीही वाया घालवलेलं आवडत नसे. वीज, पाण्याचा वापर त्यामुळेच ॲग्नेसने पुढे आपल्या संस्थातून त्याचा वापर अतिशय काटेकोरपणे केला. आईप्रमाणेच ॲग्नेस देवावर अपार श्रध्दा ठेवून ॲग्नेसची 'मदर' झाली.

ॲग्नेस व तिच्या भावंडांचे शिक्षण बिगर कॅथलिक शाळेत झाले. शाळेत चांगले धर्मोपदेशक त्यांना भेटले. ॲग्नेसला पुस्तक वाचायला खूप आवडे. ती जास्तीत जास्त वेळ लायब्ररीत वाचत बसे. अशा या आनंदी कुटुंबावर वडिलांच्या आकस्मिक मृत्यूने दु:खाची कुऱ्हाड कोसळली. वडील वारले तेव्हा ॲग्नेस फक्त सात वर्षाची होती. आईला तर हा काळाचा क्रूर घाला सोसवलाच नाही. या दु:खातून बाहेर यायला तिला वेळ लागला. या तीन भावंडांना मोठ्ठं कसं करायचं हा अवघड प्रश्न तिला छळू लागला. ॲग्नेसच्या वडिलांच्या कंपनीतला त्यांचा मित्र असलेला सहकारी लबाड निघाला. त्याने सगळा पैसा स्वत:कडे ठेवून या कुटुंबाला वाऱ्यावर सोडले. राहत्या घराखेरीज कोणताच आधार या कुटुंबाकडे राहिला नाही. दु:खातून बाहेर येऊन आईने छोटा व्यवसाय सुरू केला. या कुटुंबाला प्रथमच आर्थिक ओढाताणीचे फटके सोसावे लागले. ॲग्नेसला प्रथमच दु:खाची ओळख झाली.

ॲग्नेस बारा वर्षाची झाली. तिने आईबरोबर धर्मग्राममध्ये सामाजिक कामाचा श्रीगणेशा गिरवायला सुरुवात केली. या छोट्या मुलीला 'नन' व्हावं असं वाटू लागलं. नन होणं सोपं नव्हतं. बालपण विसरून स्वत:ला सेवाकार्यात गुंतवायचं म्हणजे खूप मोठी तपस्या होती. ननच्या रूपातून परमेश्वर आपलं सेवेचं कार्य पुढं नेत असतो. ॲग्नेसला जणू काही नन होण्याचा संदेश प्रत्यक्ष ईश्वराकडूनच आला होता. तिनं आईजवळ आपली इच्छा व्यक्त केली. आईला एवढ्या लहानपणी ॲग्नेसने नन होण्याचे स्वप्न पहावं हे काही रुचले नाही. तिनं तिला यापासून परावृत्त व्हावे म्हणून विरोधही केला. काही दिवस शांततेत गेले. यानंतर ॲग्नेस फादर जॅम्ब्रेन कॉविक यांच्या सहवासात आली. ते संतांच्या आणि मिशनरी लोकांच्या कहाण्या ऐकत. या कहाण्यातून ॲग्नेसला काही जेसुईट्स मिशनरी म्हणून भारतातल्या बंगाल प्रांतात गेल्याचे कळले. त्या मिशनऱ्यांच्या अनुभवातून ॲग्नेसला भारतात जावेसे वाटू लागले. बंगालमध्ये नर्सचा एक ग्रुप मुलांना शिकवण्याचे काम करतो हे ऐकून तिलाही तीव्रतेने हे काम करण्याची इच्छा झाली. तिच्या आशा पल्लवित झाल्या. तिचा मोठा भाऊ लष्करात गेला होता. तो नोकरीमुळे कुटुंबापासून दूर होता. ॲग्नेसने जेव्हा त्याला पत्रानं आपली नन होण्याची इच्छा कळविली तेव्हा त्याला आपल्या नाजूक अशा या छोट्या बहिणीचा निर्णय ऐकून धक्काच बसला. त्यानं तत्काळ बहिणीला पत्र लिहिलं, 'तुझ्यासारखी नाजूक मुलगी नन होणार? तू आनंदी, हसतमुख, चैतन्यमूर्ती आहेस. तू अशा निर्णयामुळे स्वत:ला संपवणार आहेस. असं करू नकोस.' ॲग्नेसचा निर्णय पक्का होता.

१९२८ साल उजाडलं ते मुळी ॲग्नेसला नन हो असा दैवी संदेश देणारे. निर्णय जसा महत्वाचा होता तसा खूप अवघड होता. प्रिय आई, बहीण, घर, गाव सगळं सोडून, हा मायेचा बंध तोडून दूरदेशी जायचं होतं. सुरक्षित जगाचा त्याग करून नव्या जगात सेवावृत्तीनं, निरलसपणे गरिबांची सेवा करायची होती. अठरा वर्षाची ही गोक्झा 'ॲग्नेस' सिस्टर होण्यासाठी ठाम निर्धारानं, मोठ्या धाडसाने उभी राहिली.

ती फादर जॅम्ब्रेनकॉविकना भेटली. तिनं स्पष्ट शब्दात तिला आलेला देवाचा निरोप, बोलावणं सांगितलं. फादरनी तिला सर्वस्व द्यायचे असेल, त्यागाची तयारी असेल तर जा.' असं सांगितलं.

चर्चच्या बाहेर बसून त्या धाडसी तरुणीनं आपला संकल्प पूर्ण करायचा निश्चय केला. घर सोडायचा निश्चय आता आईला सांगायचा होता. ही तिच्या दृष्टीनं मोठी परीक्षा होती. अविचलित न होता तिनं आपला निर्णय सांगितला. आई हे ऐकून अक्षरश: मोडून पडली. त्या परक्या देशात आपल्या या वयात आलेल्या पोरीचं कसं होणार या काळजीनं तिच्या पोटात खड्डाच पडला. मातृहृदयाला काळजी वाटणारचं. तिनं स्वत:ला खोलीत २४ तास बंद करून घेतलं. शेवटी मन घट्ट करून तिनं आपल्या लाडक्या लेकीला होकार दिला.

## भारताकडे प्रयाण

ॲग्नेसची तयारी सुरू झाली. तिनं बंगालच्या लॉरेटो कॉन्व्हेंटकडे अर्ज केला. बंगालमध्ये जाण्यापूर्वी तिला इंग्रजी शिकणं महत्वाचं होतं. आयर्लंडमध्ये दोन महिने राहून ती जुजबी इंग्रजी शिकली. स्कोपजे स्टेशनवर तिनं आईचा आणि बहिणीचा निरोप घेतला. तिला भूतकाळ मागं टाकून भविष्याकडे धाव घ्यायची होती. आई सारखी रडत होती. तिची जबाबदारी बहिणीनं घेतली. ॲग्नेसचा नवा प्रवास सुरू झाला. पुनर्जन्म झाला. नाव वेगळे, काम आवडीचे. थेट देवाचा संदेश, आज्ञा मानून ती आता कामाची सुरुवात करणार होती. भारत ही तिची नवी कर्मभूमी होती. ट्रेनिंग संपवून मुंबई, कलकत्ता आणि पुढे दार्जिलिंगचा प्रवास झाला. २६ जानेवारी १९२९ला दार्जिलिंगच्या 'लॉरेटो नॉव्हिशिएट' मध्ये नवशिकी म्हणून ती दाखल झाली. त्यावेळी दार्जिलिंग एक फॅशनेबल हिल स्टेशन होतं. ती इंग्रजांची उन्हाळी राजधानी होती. बंगालचा गव्हर्नर व त्याचे सहकारी यांचे उन्हाळ्यातील निवासस्थान दार्जिलिंग होते. या निसर्गरम्य गावात चार महिने इंग्रज अधिकारी पार्ट्या, उत्सव यात रममाण होत. त्यांचे अलिशान बंगले टेकडीवर तर पायथ्याशी हलाखीचं जीवन जगणारे गरीब असा विरोधाभास दर्शविणारे दर्शन दार्जिलिंगमध्ये होई. या झोपडपट्टीतल्या मुलांना रोज २ तास शिकवण्याचे काम तिथल्या सिस्टर्सना करावं लागे. लॅरिटोमधल्या सिस्टर्सना रहायलाही सुंदर इमारती होत्या. २ वर्षं कशी गेली ती ॲग्नेसला कळलीच

नाहीत. पण तिला मनोमन जाणवलं की, प्रार्थना, शिक्षण यापेक्षा आपल्याला काहीतरी वेगळं करायचय. इंग्रजी, बंगालीबरोबर आता तिला हिंदीही बोलता येऊ लागली.

२४ मार्च १९३१ला अॅग्नेसने शपथ घेऊन नव्या आयुष्याला सुरुवात केली. तिला वडील गेल्यानंतर गरिबीचे चटके सोसायला लागले होते. आताही गरिबांची सेवा करायची तर स्वत: गरीब होणे जरूरीचे होते. तिला देवासारखे बनायचे होते. तिचा देव गरीब, पवित्र व कनवाळू होता. तिनंही आपल्या वागण्यात शीलाचं पावित्र्य जपण्याचं ठरवलं. आता ती व्यक्ती म्हणून स्वत:च्या सुखाचा विचार करणार नव्हती. तिचं नवं आयुष्य अपरंपार सेवाव्रताचं होतं. ते तसंच राहाणार होतं.

## सिस्टर तेरेसा

अॅग्नेसला आता नवं नाव व्हॅटिकन सिटीकडून मिळालं. ते होते तेरेसा. तिनं ते स्पॅनिश उच्चाराप्रमाणे तेरेसा करून घेतलं. ती बंगाली उत्तम बोलायची म्हणून लोक तिला 'बंगाली तेरेसा' म्हणत. साध्या लॅरिटो ननची ती आता सिस्टर तेरेसा झाली. लॅरिटो नॉव्हिशिएटने तिला कलकत्त्याच्या सेंट मेरीज हायस्कूलमध्ये टीचर म्हणून पाठवले. एकूण सतरा वर्षं तेरेसा इथंच राहिली. १९३७ पासून ती प्रिन्सिपॉल म्हणून काम पाहू लागली.

इथं तिचं आयुष्य सुखाचं होतं. पांढराशुभ्र झगा पायघोळ व सैल असे. डोक्यावर कमरेपर्यंत रुळणारा काळा गाऊन असे. आनंदी व हसतमुख तेरेसा आपलं अध्यापनाचं काम मनापासून करी. इतिहास-भूगोलाचं अध्यापन करताना ती विद्यार्थिनीत रमून जायची. वीस वर्षाची तेरेसा कलकत्त्यात राहात होती पण अजून तिला कलकत्ता आपला वाटत नव्हता. जुन्या कलकत्त्यात सगळीकडे गर्दीच गर्दी होती. जुनाट घरं, अरुंद रस्ते व त्यात माणसांनी ओढायचे टांगे असं दर्शन या कलकत्त्याचं होतं.

याउलट कॉन्व्हेंटचं जग मात्र सुंदर होतं. तिथलं तळं, देखणी शाळा, प्रशस्त व्हरांडे, उंची फर्निचर, उंच दगडी भिंती, मैदान, हिरवंगार राखीव देखणं लॉन व त्यावर हुंदडणाऱ्या आकर्षक गणवेषातल्या मुली. या मुलीही श्रीमंत घरातल्या असत. ती शिकवताना तल्लीन व्हायची. शिकवता शिकवता सहज खिडकीतून बाहेर लक्ष गेलं की ती अस्वस्थ व्हायची. जवळच होतं मोतीझील झोपडपट्टीचं जग. तिथं होती अर्धनग्न कुटुंबं, त्यांचा विटका संसार, वाळत घातलेली लक्तरं व जोडीला उघडी वाहाणारी गटार व डबकी. जिकडं तिकडं घाणीचं साम्राज्य. दु:ख-दैन्याला सुमारच नाही. त्यात दुसरं महायुध्द व त्या पाठोपाठ आला दुष्काळ. बंगालच्या फाळणीनं घुसलेला निर्वासितांचा लोंढा. या सगळ्यांमुळे भिंतीपलीकडच्या या गरिबांना अनेक हालअपेष्टांना तोंड द्यावे लागले.

एन्टली धर्मग्रामाचे धर्मगुरू फादर हेन्री झोपडपट्टीत जाऊन काम करायचे. सिस्टर तेरेसाही त्यांच्याबरोबर काम करू लागली.

तिच्या अस्वस्थपणाला कामाची प्रत्यक्ष जोड मिळाली. १० सप्टेंबर १९४६ला काही कामासाठी तेरेसा रेल्वेने दार्जिलिंगला चालली होती. तिला रेल्वेत दिसले ते गरिबांचे लोंढे. घरदार नसलेली, पोटं खपाटीला गेलेली, मरण येत नाही म्हणून जगणारी, प्लॅटफॉर्मवर जागा मिळेल तिथं राहाणारी! हे उघडं-वाघडं दैन्य बघून सिस्टर तेरेसा हादरून गेली. परतीच्या प्रवासात काय करायला हवं याचं स्पष्ट ज्ञान देणारा संदेश तिला मिळाला. नुसता संदेश नव्हे तर ती आज्ञाच होती. ख्रिस्त झोपडीत आहे. तिथं जाऊन सेवा कर. ती कलकत्त्याच्या आर्च बिशपना भेटली. तिला बाहेर जाऊन काम करण्यासाठी चर्चची परवानगी आवश्यक होती. यासाठी तिला आपली राहाण्यापासून स्वतंत्र व्यवस्था करणे गरजेचे होते. बिशपना खात्री करून घ्यायची होती. म्हणून त्यांनी तिला एकटं राहून काम करण्यासाठी तुझ्याकडे शारीरिक, आत्मिक बळ आहे का? विचारलं. होणारा विरोध, अडचणी समजावून सांगितल्या. तिचा ठाम निर्धार बघून तिला परवानगी दिली.

१६ ऑगस्ट १९४८ला तेरेसाने कॉन्व्हेंटचे सुरक्षित जग सोडले. होली सिटीकडूनही परवानगीचे पत्र आले.

## स्वतंत्र संस्थेच्या प्रमुख

लॉरेटो कॉन्व्हेंटच्या सेंट मेरीज स्कूलमधील विद्यार्थिनींना शिकवताना समोर दिसणाऱ्या विराट अशा मोतीझील झोपडीतल्या दारिद्र्याच्या बकाल दर्शनाने दयाळू मदर तेरेसा अस्वस्थ वहायच्या. त्या झोपडवस्तीतून स्वत: दरिद्री होऊन त्या गरिबांची सेवा तीही निरपेक्ष, निरलस होऊन त्यांना करायची होती. त्या पाहात होत्या ती कलकत्त्यातील अती श्रीमंती व दुसरीकडे अतोनात हालअपेष्टेत जीवन जगणारी ही झोपडवस्तीतील बकाल गरीब वस्ती. या महानगरात येणारे महालोंढे अधिकाधिक दैन्यावस्थेत भर घालत होते. कोंबड्यांची खुराडी बरी म्हणावीत अशा त्या झोपड्या. जवळ वाहाणारी गटारे म्हणजे डासांच्या वस्त्याच. आता मदर तेरेसांना काम अशा वस्तीत करायचे होते जिथं अशा कामाची गरज होती. पावसाळ्यात तर या गरिबांचे हाल बघवत नसत.

कलकत्ता हीच आपली कर्मभूमी आहे हे त्यांनी आपल्या मनाशी निश्चित केलं. पाटण्याला जाऊन चार महिन्यांचं या कामासाठी परिचारिका कोर्स व वैद्यकीय प्रशिक्षण पूर्ण केलं. 'लिटल सिस्टर्स ऑफ द पुअर' कॉन्व्हेंटमध्ये त्या आता राहू लागल्या. इथून मोतीझील झोपड्यांचं अंतर खूपच दूर होतं यासाठी त्यांना सकाळीच चहा-नाश्ता आटपून दुपारसाठी डबा घेऊन जावं लागे.

डबा म्हणजे भाजी पोळी नवहे तर भात व चवीला मीठ. बस. दुपारी एवढ्यावरच त्यांचं जेवण आटपे. आता त्यांनी आपला ड्रेसही ठरवला. जाड्याभरडया सुताची पांढरी साडी, पांढरा लांब बाह्याचा ब्लाऊज. साडीचे निळे काठ. साडीची सवय त्यांनी भारतात काम करायचे ठरल्यावर लावून घेतली. ज्यामुळे त्या झोपडवासियांना भारतीय वाटत. डोक्यावर पदर घेऊन ऊन, पाऊस, थंडी या कशाचीही पर्वा न करता अखंड त्यांचं काम सुरू असे. बसने जा–ये करीत.

दिवसभराच्या कामाची नोंद रोज रात्री करण्याची प्रथा त्यांनी ठेवली. या नोंदवहीत जसे प्रारंभीचे कष्ट होते तशीच त्यांची जिद्द व धडपडही होती. झोपडपट्टीतल्या मुलांना शिकायला शाळा नव्हती. मदर तेरेसांच्या मनात आलं की, या मुलांना शिक्षणापासून दूर लोटायचे नाही.

## अशी सुरू झाली शाळा

शाळेची गरज मदरनी पालकांना पटवून दिली. पहिल्या दिवशी दोन मुलं शाळेत आली. शाळेला जागा कोठून आणणार? तिथंच रस्त्याच्या कडेला स्वच्छता केली. हातात टोकदार काठी घेऊन मातीत काठीनं धुळाक्षरे गिरवायला सुरू झाली. आता दोनाची पाच मुले झाली. या बुटक्या, गोऱ्या, प्रेमळ बाईबद्दल सर्वांनाच उत्सुकता होती. झाडाखालची ही शाळा हळूहळू मुलांना आवडू लागली. अक्षर गिरवताना त्याचे उच्चारण आता त्या वस्तीत घुमू लागलं. गोष्टी, प्रार्थना यात मुलं आता रमू लागली. शिकवण्याची भाषा बंगाली होती. मदर तेरेसांची सदा हसतमुख असलेली छोटीशी मूर्ती या नवीन उपक्रमामुळे प्रसन्न दिसू लागली. हे नवं आव्हान मदर तेरेसांना यशस्वी करायचं होतं.

वस्तीला आपली मुलं शिकून शहाणी होणार याचा विलक्षण आनंद होता. शाळा आपली आहे हे लक्षात घेऊन शाळेला लागणाऱ्या वस्तू जमा होऊ लागल्या. कुणी कुठूनतरी फळा आणला. फळ्यापाठोपाठ खडू आले. मग पाट्याही आल्या. तेरेसांना बसायला जुनी खुर्ची व कामासाठी टेबल या लोकांनीच मिळवले. १९४८ साली अशा प्रकारे एक छोटी शाळा सुरू झाली. शाळेमुळे तिथं उत्साही वातावरण निर्माण झाले.

एन्टली धर्मग्रामाचे धर्मगुरू फादर हेन्रींच्या बरोबर मदर तेरेसांनी काम केलं होतं. त्यामुळे मदर काय करतात याकडे त्यांचे लक्ष होते. हेन्रीचं वागणं, बोलणं, दिसणं अतिशय सभ्य होतं. युरोपियन रीतीरिवाज त्यांच्या देखण्या व्यक्तिमत्वाला अगदी शोभून दिसत. मदरना चांगल्या तऱ्हेचं घर मिळावं, त्यांची दमणूक थोडी कमी व्हावी असं त्यांना मनापासून वाटे. वस्तीतल्या लोकांनी मदरना आपलेपणाने एक खोली वस्तीतच दिली होती. ती खोली इतकी जुनी होती की, केव्हाही ती पडू शकली असती. फादर हेन्रींना त्यामुळे नेहमीच मदर तेरेसांची काळजी वाटे. ते त्यांच्यासाठी नवी खोली शोधू लागले.

शाळेलाही इमारत नव्हती. शाळा उघड्यावरच भरे. त्या झोपडपट्टीतल्या मुलांना स्वच्छता आधी कशी करायची याचे पाठ द्यावे लागले. स्वच्छतेबरोबर आरोग्याचे धडे ही मदरनी दिले. काही अस्वच्छ मुलांना तर आंघोळही घालावी लागे. मुलांना शाळेची गोडी लागावी व त्यांनी स्वच्छही राहावे म्हणून त्या शाळेत आलेल्या मुलांना साबणाची वडी भेट देत. ही सुगंधी साबणाची वडी मोतीझीलच्या झोपडपट्टीतल्या लोकांनी यापूर्वी कधी पाहिलीही नव्हती. हा खर्च मदर स्वत:चा खर्च वाचवून करीत. चपाती–भात हे साधे जेवणही त्यांनी बंद केले. मुलांच्याबरोबर त्या मुरमुरे खात. जसे हे शरीर स्वच्छतेचे धडे त्या देत असत त्याचबरोबर मुलांच्या जिभेला जी गलिच्छ भाषा बोलायची सवय लागली होती, तीही त्यांनी खास लक्ष देऊन काढली.

मदर तेरेसांचे शाळेचे काम पाहून एका धर्मगुरूंनी त्यांना शंभर रुपयांची देणगी दिली. पैसे हातात येताच त्यांनी आधी शाळेसाठी पाच रुपये महिना भाड्याच्या दोन खोल्या घेतल्या.

आता शाळेतील मुलांची संख्या तीस झाली. शाळेबरोबर वस्तीतल्या गरजू आजारी लोकांना त्या औषधेही देऊ लागल्या. जिथं जे मिळे ते ते या वस्तीतल्या लोकांच्यासाठी त्या गोळा करीत. ही औषधेही त्यांना कुणीतरी दिलेली असत. रोज यासाठी त्या एक भिक्षाफेरी काढत. शहरातल्या अनेक श्रीमंतांना भेटून आपलं काम व गरजा त्या सांगत. कधी त्यांची रिकामी झोळी भरून जाई तर कधी काहीच मिळत नसे. यामुळे त्या नाराज न होता पुढल्या धनिकाकडे जात.

एक दिवस फादर हेन्रींच्या धडपडीला यश आलं. ते मदर तेरेसांच्यासाठी घर बघण्यासाठी रोज सायकल फेरी काढत. '१४ क्रीक लेन' या ठिकाणी तिसऱ्या मजल्यावरची एक खोली मिळवली. खोली एक असली तरी तशी मोठी होती. जवळच ऐसपैस गच्ची होती. व्हरांडे होते. मदरना खोली खूप आवडली. त्यांचं बिऱ्हाड आता त्या खोलीत विसावलं.

याच खोलीत 'मिशनरीज ऑफ चॅरिटी' या स्वतंत्र व्यवस्थेची स्थापना झाली. चार वर्षं या खोलीतच वास्तव्य होतं. आज या मोठ्या खोलीत प्रथमच त्यांना एकटेपणा खायला उठला. रोजची प्रार्थनेची वेळ झाली नी त्या एकटेपणा विसरल्या. त्यांनी देवाजवळ झगडण्याचं बळ मागितलं. त्यागापासून परावृत्त न करण्याची विनवणी केली. मायकेल गोम्स या घरमालकांना मदर तेरेसांच्या कामाबद्दल अतिशय आदर होता. ते त्यांना हरतऱ्हेची मदत करत. मदरबरोबर मदतफेरीत सहभागी होतं.

मदर आता एकट्या राहिल्या नाहीत. त्यांना अनेक सिस्टर्स येऊन मिळाल्या. १४ जणींचे हात आता काम करू लागले. संस्थेला आकार येऊ लागला. मदर तेरेसांचा कामाचा उत्साह वाढू लागला. मदर तेरेसांच्या कष्टाला अंत नव्हता. दिवसभराच्या श्रमांनी डोळे संध्याकाळ होताच जड झाले तरी आपल्या वहीतल्या नोंदी त्या पुऱ्या करीत. दिवसभरातले अनुभव, भेटलेल्या भल्या व्यक्ती यांच्याबद्दल डायरीत नोंदी होत. मगच त्या कामाच्या तृप्तीत शांतपणे झोपत.

# मदर तेरेसा आणि सहकारी

मदर तेरेसा खोलीच्या फरशा पुसण्यात दंग होत्या. तेवढ्यात त्यांची विद्यार्थिनी सुभाषिनी दास त्यांना भेटायला आली. तिनं त्यांच्याबरोबर काम करायची इच्छा प्रदर्शित केली. मदर तेरेसांच्या सहकाऱ्यांत सामील झालेली पहिली बंगाली स्त्री म्हणूनही तिचे महत्व आहे. याशिवाय मदर तेरेसांच्या कामात तिनं स्वत:ला असं काही झोकून दिलं की, पुढे ती मदरच्या 'मिशनरीज ऑफ चॅरिटी' या संस्थेत तिचं स्थान दुसऱ्या क्रमांकाचं राहिलं. यानंतर अनेक तरुण मुली मदरच्या कामाकडे खेचल्या गेल्या. सगळ्या तरुण आणि उत्साही. त्यामुळे कामाला भलताच वेग आला. या सगळ्या कॉलेजमध्ये शिकणाऱ्या मुली होत्या. आपलं शिक्षण करून त्या या कामात सामील झाल्या होत्या. मदर तेरेसा खऱ्या अर्थानं त्यांच्या मदर होत्या. या मुलींच्या जेवणाकडे त्या विशेष लक्ष देत. त्यांचा आहार पौष्टिक राहील हे त्या पाहात. क्षयरोग्यांचं काम या मुलींना करावं लागे. त्या मुलींना संसर्ग होऊ नये म्हणून कामावरुन आल्यावर त्यांना त्या स्वच्छ आंघोळ करायला लावीत. कपडे उकळून धुवायला लावीत. त्यामुळे एकीलाही क्षयबाधा झाली नाही.

मुली राहायला तिथंच होत्या. एका खोलीत त्या राहात व दुसऱ्या खोलीत मुली राहात. मदर तेरेसांच्या बरोबर या मुलींचा दिवसही प्रार्थनेने सुरू होई. दिवसातून ५ तास प्रार्थना करायला हवी असा तेरेसांचा अग्रह असे. प्रार्थनेने आत्मिक बळ वाढतं असा त्यांचा विश्वास होता. कामाला या मुलींना जोडीजोडीने पाठवले जाई. मदर तेरेसा आपल्या कार्याची मूल्यं या नवीन संघात जास्तीत जास्त रुजविण्याचा प्रयत्न करीत. हा संघ म्हणजे त्यांच्या कार्याचा पाया होता.

काटकसर मदर स्वत: करीत असल्यामुळे तीच अपेक्षा या मुलींच्याकडून त्यांची असे. प्रत्येकीला तीन साड्या दिल्या जात. दोन नेहमीच्या वापरासाठी तर एक अडचणीला उपयोगी पडेल म्हणून ठेवली जाई. एका धनिकानं देऊ केलेलं वॉशिंग मशीन न स्वीकारता त्यांनी या मुलींच्यापुढे हा आदर्श ठेवला की, स्वत:च्या सुखासाठी वा आरामासाठी कोणतीही वस्तू स्वीकारायची नाही. त्यांची ओळी ही फक्त गरिबांना उपयोगी पडेल अशा वस्तूंसाठी होती.

मदर आपल्या या सिस्टर्सना वेळोवेळी खूप काही सांगत. त्यांचं नेहमी असं सांगणं असे की, लोकांना तुमच्यात माझे दर्शन झाले पाहिजे. आपल्याला निव्वळ निधी जमा करायचा नाही. आपला भर कार्यावरच राहील. आपण ज्यांची सेवा करतो ते दीन आहेत, दुबळे आहेत. त्यांना पोटाची खळगी भरणेही शक्य नाही. ते निराधार, अपंग, जसे आहेत तसे काही कुष्ठरोगी, क्षयरोगी आहेत. त्यांना देव मानून त्यांच्याशी प्रेमाने वागा. सेवा करताना चेहऱ्यावर त्रासिक भाव न ठेवता तो हसरा ठेवा. त्यामुळे मरणयातनाही त्यांना सुखाच्या वाटतील. त्यांना आपली गरज आहे अशी भावना न ठेवता उलट आपल्यालाच त्यांची गरज आहे अशी वृत्ती ठेवा. वाणी गोड हवी. त्यांना